।। जय जय रघुवीर समर्थ ।।

स्वाध्याय ३

दशक १२ समास २

प्रत्यय निरूपण

मागचा समास प्रपंच आणि परमार्थ याची सांगड घालणारा होता. या समासात प्रपंचात यश कसे प्राप्त करायचे तसेच रोजच्या जीवनात येणारे कडू-गोड अनुभव म्हणजेच येणारा प्रत्यय यावर श्रीसमर्थ भाष्य करतात.

आपल्या सर्वांना वाटते की माझा प्रपंच सुखाचा,आनंदाचा असावा. अर्थात त्यासाठीच आपण सर्वकाही करत असतो. तरीपण कुठेतरी काहीतरी चुकते आणि मनासारखे होत नाही. त्यामुळे आपण उदास होतो,दुःखी होते. पण असे का? याचा विचार करतो का? आपल्याला तपासून पाहतो का? याचे उत्तर " नाही " असेच बहुतेकवेळा असते. श्रीसमर्थ यावर विचार करायला लावतात. आपण अपयशाची कारणे शोधतो व सर्वात सोपे उत्तर " माझे नशीब, माझे प्रारब्ध , दुसरे काय? " असेच उत्तर शोधतो व आपल्या अपयशावर पांघरून घालतो.

आपण सतत कर्म करत असतो, त्याचे बरे वाईट फळ मिळतेच मिळते. ज्याचे लगेच फळ मिळते त्याला क्रियमाण कर्म म्हणतात. ज्या कर्माचे फळ कालांतराने मिळते त्याला संचित कर्म म्हणतात. अशी अनेक संचित कर्मे जमा होतात व ती पुढील जन्मासाठी जमा होतात. त्याचे फळ ( गेल्या जन्माचे कर्मफळ ) तेव्हा भोगावे लागते त्याला प्रारब्ध म्हणतात.

म्हणजे यश किंवा अपयशाला आपणच जबाबदार असतो ना! पण आपल्याला यशच मिळवायचे आहे, त्यासाठी काय करावे? याचे उत्तर श्रीसमर्थ ६ व्या ओवीत देतात. --

अचूक यत्न करवेना।

म्हणोन केले ते सजेना।

आपला अवगुण जाणवेना।

काही केल्या।।

यश मिळण्यासाठी आपण योग्य दिशेने,योग्य प्रकारे,योग्य विचार करून,योग्य वेळी प्रयत्नच करत नाही. याला काय म्हणावे? मला परीक्षेत यश मिळवायचे आहे तर त्या विषयाचे सखोल ज्ञान करवून घेणे आवश्यक असते. त्यावर अभ्यास करावा लागतो, घाम गाळावा लागतो, नुसते क्लासला जाऊन चालत नाही. चिंतन मनन करावे लागते. सराव करावा लागतो, परीक्षेचे स्वरूप पाहावे लागते, दिलेल्या कालावधीत मी सर्व प्रश्न अचूक सोडवू शकतो का याचा विचार करून स्वतःची कमकुवत बाजू भक्कम करावी लागते. मन शांत ठेवावे लागते. अभ्यास हेच ध्येय ठेवून वाटचाल करावी लागते मगच यश मिळते. आधी कष्ट मग फळ. हे एक उदाहरण दिले. आपण आखणी करून जगतो का? डोळ्यासमोर ध्येय ठेवून आखणी करतो का? असे न करता आपण अपयशाची कारणे शोधून त्याचे समर्थन करतो व मी कसा बरोबर आहे हे इतरांना पटवून देण्याचा प्रयत्न करतो. पण माझे मीच नुकसान करून घेत आहे हेच समजत नाही, कारण आपल्याला ते समजून घ्यायचच नसत कारण मी कायम बरोबर हीच धारणा! याला काय म्हणावे? आपण आत्मपरीक्षण करतच नाही. श्रीसमर्थ हे करायला सांगतात. त्यांना प्रयत्नवाद मान्य आहे प्रारब्ध नाही.

समाजात आपल्याला चांगले म्हणावे,आपले कौतुक करावे/ व्हावे असे वाटते. मग तसे वागले पाहिजे. लोकांशी गोड बोलावे,त्यांना समजून घ्यावे, त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात. यथाशक्ती मदत करावी. आपल्या वर समाजाचे दायित्व असते, त्याची जाणीव ठेवलीच पाहिजे. लोकांसाठी झिजावे, जसे बोलतो तसे वागावे तरच आपली किंमत राहते. जसे कर्म करू तसे फळ मिळते. सर्वांवर प्रेम करावे,आपकुलकीने वागावे,दुसऱ्यासाठी घाम गाळावा, कष्ट करावे. थोडक्यात आपण जसे वागतो,बोलतो त्यानुसार लोक आपल्याशी वर्तन करतात. म्हणजे समोरच्याने कसे बोलावे हे सर्व आपल्यावर अवलंबून असते. त्यामुळे सतत आपल्याला तपासावे. एवढे करूनसुद्धा जर वाईट माणूस भेटला तर ---

खळ दुर्जन भेटला।

क्षमेचा धीर बुडाला।

तरीच मोनेची स्थळत्याग केला।

पाहिजे साधके।।२४

वाईट माणसांची संगत करू नये,त्यांना सुधारायला जाऊ नये कारण ते त्याच्या पलीकडे असतात. त्यांच्याशी वाद घालू नये,करू नये. त्या ऐवजी आपण तेथून निघून जावे. आपले कर्म उभे करू नये.

हे सर्व करताना मृत्यूचे भान राखावे. एक ना एक दिवस सर्व सोडून जायचे आहे हे पक्के समजावे. प्रसंग ओळखूनच सर्व ठिकाणी वागावे बोलावे मग ती भगवंताची कथा असो,निरूपण असो वा राजकारण. आपण किती शिकलो यापेक्षा त्या विद्येचा उपयोग आपण कसा करतो हे जास्त महत्वाचे असते, अन्यथा र्य विद्येचा काहीही उपयोग नाही.

अशा प्रकारे श्रीसमर्थ अनेक बाजूनी यश मिळवण्यासाठी काय करायला हवे हे स्पष्ट करतात.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।